पुढारी MY कोल्हापूर शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२६

# विवेकानंद कॉलेजमध्ये खाशाबा जाधव यांच्या क्रीडा साहित्य प्रदर्शनास प्रतिसाद

**कोल्हापूर :** भारताला ऑलिम्पिक स्पर्धेत वैयक्तिक कुस्ती प्रकारात पहिले कांस्यपदक मिळवून देणारे ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांच्या क्रीडा साहित्याचे विवेकानंद कॉलेजमध्ये प्रदर्शन आयोजित करण्यात आले. डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथे भरविण्यात आलेल्या प्रदर्शनात खाशाबा जाधव यांचे क्रीडा साहित्य, छायाचित्रे तसेच वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेले लेख व साहित्य मांडण्यात आले होते. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. मिलिंद एस. हुजरे यांच्या हस्ते झाले. यावेळी राष्ट्रीय खेळाडू श्लोका शिंदे (फेन्सिंग), वैष्णवी कुशाप्पा (कुस्ती), श्रीनंदन मालपाणी (योगा), श्रीवर्धन पाटील (जलतरण) आणि नेहाली पाटील (टेबल टेनिस) यांचा फेटे बांधून व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. श्रीनंदन मालपाणी यांनी योग प्रात्यक्षिकातून गणेशवंदना सादर केली. डॉ. विकास जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रा. संतोष कुंडले यांनी आभार मानले.

पुढारी MY कोल्हापूर शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२६

पुढारी MY कोल्हापूर शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२६

# सृष्टी, विवेक, अरीन विजयी

## शालेय मनपास्तर बुद्धिबळ स्पर्धा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर महानगरपालिका व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आयोजित शालेय मनपास्तर बुद्धिबळ स्पर्धेच्या १४ व १७ वयोगटांत सृष्टी, विवेक व अरीन यांनी विजेतेपद पटकाविले. सेंट झेवियर्स हायस्कूलमध्ये या स्पर्धा सुरू आहेत. दोन्ही गटांत सुमारे २०० स्पर्धक सहभागी झाले होते.

गुरुवारी झालेल्या स्पर्धेतील अनुक्रमे विजेते स्पर्धक असे : १७ वयोगट मुली : सृष्टी जोशीराव (प्रायव्हेट हायस्कूल), अरिना मोदी (पोदार इंटरनॅशनल स्कूल), स्नेहल गावडे (प्रायव्हेट इंग्लिश स्कूल), नियती चोडणकर (म.ल.ग. हायस्कूल), प्रांजल चव्हाण (वसंतराव जयवंतराव देशमुख हायस्कूल). मुले : अरीन कुलकर्णी (विवेकानंद कॉलेज), राधेश्वर ठोंबरे (न्यू मॉडेल स्कूल), सर्वेश पोतदार (मेन राजाराम हायस्कूल), रूद्र बेवीनकट्टी (विद्यापीठ हायस्कूल), अंशुल चुयेकर (सेंट झेविअर्स हायस्कूल). १४ वयोगट मुले : विवेक चित्रकार (तेजस मुक्त विद्यालय), अर्णव पाटील (न्यू हायस्कूल), अर्णव पोर्लेकर (न्यू हायस्कूल), अर्जित पाटील (वसंतराव जयवंतराव देशमुख स्कूल), अन्वय भिवरे (माईसाहेब बावडेकर ॲकॅडमी). संयोजन क्रीडा निरीक्षक सचिन पांडव, किरण खटावकर, राहुल माने, उमेश पाटील, मुख्य पंच भरत चौगुले, आरती मोदी, मनिष म्हारूलकर, महेश व्यापारी, किरण शिंदे, माधुरी पाटील हे करत आहेत.





**कोल्हापूर : मनपास्तर शालेय बुद्धिबळ स्पर्धेतील १७ व १४ वयोगटांतील विजेते खेळाडू. सोबत संयोजक.**

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा
शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर २०२६

# सृष्टी, अरिना, स्नेहल, नियती, प्रांजल अजिंक्य

## • शासकीय शालेय मनपास्तर बुद्धिबळ स्पर्धा



**जनप्रवास : कोल्हापूर**

सेंट झेवियर्स हायस्कूल येथे सुरु असलेल्या कोल्हापूर महानगरपालिका व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आयोजित शासकीय शालेय मनपास्तर बुद्धिबळ स्पर्धेत १७ वर्षाखालील मुली गटात गुरुवारी झालेल्या सामन्यात सृष्टी, अरिना, स्नेहल, नियती, प्रांजल यांनी प्रतिस्पर्धी खेळाडूंवर मात करत अजिंक्यपद पटकविले. या स्पर्धेत १७ वर्षाखालील मुले गटात १४४ तर मुली गटात मुली ४० खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता.

१७ वर्षाखालील मुली गटातील स्पर्धेचा अंतिम विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे - सृष्टी जोशीराव प्रायव्हेट हायस्कूल, अरिना मोदी, पोदार इंटरनॅशनल स्कूल, स्नेहल गावडे प्रायव्हेट इंग्लिश मीडियम स्कूल, नियती चोडणकर, मलग हायस्कुल, प्रांजल चव्हाण, वसंतराव जयवंतराव देशमुख हायस्कुल.

१७ वर्षाखालील मुले गटातील स्पर्धेचा अंतिम विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे - अरीन कुलकर्णी, विवेकानंद कॉलेज, राधेश्वर ठोंबरे न्यू मॉडेल इंग्लिश मीडियम स्कूल, सर्वेश पोतदार मेन राजाराम हायस्कूल, रुद्र बेवीनकट्टी, विद्यापीठ हायस्कुल, अंशुल चुयेकर, सेंट झेविअर्स हायस्कुल.

१४ वर्षाखालील मुले गटातील स्पर्धेचा अंतिम विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे- विवेक चित्रकार, तेजस मुक्त विद्यालय, अर्णव पाटील, न्यू हायस्कुल, अर्णव पोर्लेकर, न्यू हायस्कुल, अर्जित पाटील, वसंतराव जयवंतराव देशमुख इंग्लिश मिडीयम स्कुल, अन्वय भिवरे, श्रीमंत माईसाहेब बावडेकर अकॅडमी.

क्रीडा निरीक्षक सचिन पांडव, किरण खटावकर, राहुल माने, उमेश पाटील तांत्रिक सहकार्य तर मुख्य पंच भरत चौगुले, आरती मोदी, मनिष म्हारूलकर, महेश व्यापारी, किरण शिंदे, माधुरी पाटील यांनी पंच म्हणून काम पाहिले.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा
● शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर २०२६

# ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव क्रीडा साहित्याचे विवेकानंदमध्ये प्रदर्शन

**जनप्रवास : कोल्हापूर**

ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांच्या क्रीडा साहित्य, फोटो, वर्तमानपत्रातील त्यांच्यावर आलेले लेख, साहित्य इत्यादीचे प्रदर्शन विवेकानंद कॉलेजमधील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनमध्ये आयोजित करण्यात आले होते.

क्रीडा दिनाचे औचित्य साधून हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर क्रीडा क्षेत्रात महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवणाऱ्या खेळाडूंचा सन्मानचिन्ह देऊन पाहुण्यांच्या हस्ते राष्ट्रीय खेळाडू श्लोका शिंदे (फेन्सिंग), वैष्णवी कुशाप्पा (कुस्ती), श्रीनंदन मालपाणी (योगा), श्रीवर्धन पाटील (जलतरण), नेहाली पाटील (टेबल टेनिस) यांचा सत्कार केला. यातील श्रीनंदन मालपाणी याने योगाच्या प्रात्यक्षिकातून गणेश वंदना सादर केली. कार्यक्रमाची सुरुवात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन करण्यात आली. प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे म्हणाले, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास विकसित करणे, युवा खेळाडूंना प्रोत्साहन देणे या उद्देशाने यशस्वी खेळाडूंचा सत्कार केला आहे. त्यांचा आदर्श इतर खेळाडूंनी घ्यावा व महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करावे. प्रास्ताविक जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संतोष कुंडले यांनी केले तर आभार प्रा. प्रशांत कांबळे यांनी मानले. जिमखाना विभागातील सर्व प्राध्यापक, सुरेश चरापले आदी उपस्थित होते.

4.9.26

सकाळ TODAY
कोल्हापूर, शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२६

# मनपास्तर बुद्धिबळ स्पर्धेत अरीन, सृष्टी विजेते

कोल्हापूर, ता. ३ : महापालिकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलांमध्ये विवेकानंद महाविद्यालयाच्या अरीन कुलकर्णी, तर मुलींमध्ये प्रायव्हेट हायस्कूलच्या सृष्टी जोशीरावने विजेतेपद पटकाविले. १४ वर्षांखालील मुलांमध्ये तेजस मुक्त विद्यालयाचा विवेक चित्रकार विजेता ठरला. महापालिका व जिल्हा क्रीडा कार्यालयातर्फे सेंट झेवियर्स हायस्कूलमध्ये स्पर्धा झाली. १७ वर्षांखालील मुलांमध्ये १४४, तर मुलींमध्ये ४० मुलींनी सहभाग नोंदवला.



कोल्हापूर : महापालिकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेतील १७ वर्षांखालील मुले-मुली व १४ वर्षांखालील मुलांच्या गटातील विजेत्यांसमवेत सचिन पांडव, किरण खटावकर, राहुल माने, उमेश पाटील.

निकाल असा : १७ वर्षांखालील मुले : अरीन कुलकर्णी, राधेश्वर ठोंबरे (न्यू मॉडेल इंग्लिश मीडियम स्कूल), सर्वेश पोतदार (मेन राजाराम हायस्कूल), रूद्र बेवीनकट्टी (विद्यापीठ हायस्कूल), अंशुल चुयेकर (सेंट झेवियर्स हायस्कूल). मुली : सृष्टी जोशीराव, अरिना मोदी (पोदार इंटरनॅशनल स्कूल), स्नेहल गावडे (प्रायव्हेट इंग्लिश मीडियम स्कूल), नियती चोडणकर (महाराणी लक्ष्मीबाई गर्ल्स हायस्कूल), प्रांजल चव्हाण (वसंतराव देशमुख हायस्कूल).

१४ वर्षांखालील मुले : विवेक चित्रकार, अर्णव पाटील (न्यू हायस्कूल), अर्णव पोर्लेकर (न्यू हायस्कूल), अर्जित पाटील (वसंतराव देशमुख इंग्लिश मीडियम स्कूल), अन्वय भिवरे (माईसाहेब बावडेकर अॅकॅडमी).

तरुण भारत संवाद

शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर २०२६

# प्राचार्य कुंभार यांना शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार



**बाकरे :** कोपार्डे (ता. करवीर) येथील स.ब.खाडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार यांना महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा डॉ.जे.पी.नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार २०२५-२६ जाहीर झाला आहे. प्राचार्य कुंभार यांनी यापूर्वी किसनवीर महाविद्यालय, वाई आणि विवेकानंद महाविद्यालय येथे प्राध्यापक म्हणून काम केले. विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद महाविद्यालयासह अन्य महाविद्यालयात त्यांनी प्राचार्य म्हणून काम केले.गेल्या जूनपासून ते स.ब. खाडे महाविद्यालयात प्राचार्य म्हणून रुजू झाले आहेत. गेल्या ३७ वर्षात शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्याचा विचार करून त्यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांना सांगरूळ शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी आमदार जयंत आसगावकर, अध्यक्ष यशवंत खाडे,उपाध्यक्ष, सहसचिव, खजानीस व सर्व संचालकांचे सहकार्य लाभले.या पुरस्काराबद्दल त्यांचा महाविद्यालयात सत्कार करण्यात आला.

पुढारी शहर-जिल्हा कोल्हापूर, शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२६

# खाशाबा जाधव यांच्या क्रीडा साहित्याचे प्रदर्शन

**कोल्हापूर :** भारताला ऑलिम्पिक स्पर्धेत वैयक्तिक कुस्ती प्रकारात पहिले कांस्यपदक मिळवून देणारे ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांच्या क्रीडा साहित्याचे विवेकानंद कॉलेजमध्ये प्रदर्शन आयोजित करण्यात आले. डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथे भरविण्यात आलेल्या प्रदर्शनात खाशाबा जाधव यांचे क्रीडा साहित्य, छायाचित्रे तसेच वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेले लेख व साहित्य मांडण्यात आले होते. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. मिलिंद एस. हुजरे यांच्या हस्ते झाले. यावेळी राष्ट्रीय खेळाडू श्लोका शिंदे (फेन्सिंग), वैष्णवी कुशाप्पा (कुस्ती), श्रीनंदन मालपाणी (योगा), श्रीवर्धन पाटील (जलतरण) आणि नेहाली पाटील (टेबल टेनिस) यांचा फेटे बांधून व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. श्रीनंदन मालपाणी यांनी योग प्रात्यक्षिकातून गणेशवंदना सादर केली. डॉ. विकास जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रा. संतोष कुंडले यांनी आभार मानले.